॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ४९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

✻ सुविचार ✻
नेहमी मोठे ध्येय व उच्च विचार ठेवा व ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा.

# पेपरफुटी प्रकरणी 'फास्ट ट्रॅक कोर्टा'ची स्थापना

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिला सक्त आदेश

**● नवी दिल्ली । वीरभूमी –** नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि शिक्षण क्षेत्रातील अव्यवस्थेविरोधात कॉक्रोच जनता पार्टीने सुरू केलेल्या आंदोलनाला देशभरातून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. दरम्यान, पेपरफुटीची जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, ही मागणी सीजेपी आणि विरोधी पक्षांनी लावून धरली आहे. या पार्श्वभूमीवर आज सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील विद्यार्थ्यांचे हित आणि भविष्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत पेपरफुटी प्रकरणी दोषींना कठोर शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करण्यात येईल अशी घोषणा केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या कुठल्याही व्यक्तीला सोडले जाणार नाही, असा इशाराही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर एक पोस्ट करत यासंदर्भातील माहिती दिली आहे. तसेच तरुणांचे हित आणि भविष्य याला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असेल, असेही त्यांनी सांगितले आहे. याबाबत केलेल्या पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिले की, देशातील तरुणांचे हित आणि त्यांचे भविष्य याला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पेपरफुटी प्रकरणातील सर्व दोषींना लवकरात लवकर कठोर शिक्षा सुनावण्यासाठी आणि खटल्याची त्वरित सुनावणी व्हावी यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना केली जाईल. तसेच या संदर्भात आवश्यक ती पावले उचलण्यात यावीत, असे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत, अशी माहितीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.

मोदींनी या पोस्टमध्ये पुढे लिहिले की, विद्यार्थ्यांचे हित सुरक्षित करण्यासाठी सरकारकडून घेण्यात आलेल्या निर्णयांच्या साखळीमधील हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या कुठल्याही व्यक्तीला सोडले जाणार नाही, असा इशाराही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. नीट पेपर लीक आणि दिल्लीत सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान केंद्र सरकारच्या भूमिकेवर चौफेर टीका होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिलेली ही प्रतिक्रिया महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

## सोनम वांगचुक यांचे २६ दिवसांनंतर उपोषण समाप्त

**● नवी दिल्ली । वीरभूमी–** शिक्षण व्यवस्थेतील कथित परीक्षा गैरव्यवहार आणि पेपरफुटी प्रकरणांवर कठोर कारवाई, तसेच विद्यार्थ्यांच्या मागण्यांना न्याय मिळावा यासाठी मागील २६ दिवसांपासून बेमुदत उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमी सोनम वांगचुक यांनी अखेर आपले उपोषण मागे घेतले आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्यासोबत झालेल्या दीर्घ चर्चेनंतर त्यांनी हा निर्णय घेतला.

उपोषण सोडताना रुग्णालयात झालेल्या भावनिक क्षणांमध्ये केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी वांगचुक यांना ज्यूस पाजून उपोषण सोडण्याची विनंती केली, तर डॉ. जितेंद्र सिंह यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अँगमो आणि लेह-लडाखमधील 'एपेक्स बॉडी'चे वरिष्ठ पदाधिकारीही उपस्थित होते.

सोनम वांगचुक यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर माहिती देताना सांगितले की, केंद्र सरकारशी अनेक दिवस चर्चा सुरू होती. देशात आंदोलन अधिक तीव्र होऊन हिंसाचाराची शक्यता निर्माण होऊ नये, तसेच संसदेत परीक्षा पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांशी संबंधित प्रश्नांवर सर्वपक्षीय स्तरावर चर्चा करण्याचे आश्वासन मिळाल्याने त्यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी सांगितले की, विविध पक्षांतील ६५ खासदारांनी प्रत्यक्ष भेट घेऊन किंवा पत्राद्वारे उपोषण सोडण्याची विनंती केली होती.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### जंतरमंतर

हातात दंडुके घेऊन
ते भविष्य मारत आहे
दडपशाहीला सांगा कोणी
तोच उद्याचा भारत आहे

सत्तेचा उन्मत्त अहंकार
झुरळाने पेटला का सूडाशी
किती वाचवणार खुर्चीला
आग लागल्यावर बुडाशी

## SPOT NEWS

### भंडारदरातून नदीपात्रात एक हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग

**● अहिल्यानगर –** भंडारदरा धरणातून आज दुपारी ३.३० वाजता प्रवरा नदीपात्रात १,००० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सोडण्यात येणार असून, पावसाचे प्रमाण लक्षात घेता या विसर्गामध्ये टप्प्याटप्प्याने वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवरा नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने सतर्क राहावे, असे आवाहन जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे यांनी केले आहे. प्रवरा नदीकाठच्या अकोले, संगमनेर व ओझर बंधाऱ्याखालील राहाता, राहुरी, श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यातील नदीकाठच्या सर्व गावांना व वस्त्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### कॉकरोच जनता पार्टीची देशव्यापी आंदोलनाची हाक

**● नवी दिल्ली –** गेल्या महिनाभरापासून दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने आता तीव्र रूप धारण केले आहे. अभिजित दिपके यांच्या कॉकरोच जनता पार्टीने शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी देशभरातील सर्व जिल्ह्यांत एक दिवस, एक मागणी या नावाखाली मोठअया देशव्यापी शांततापूर्ण आंदोलनाची घोषणा केली. नीट पेपरफुटी प्रकरण आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईचा निषेध नोंदवत देशभरातील तरुण आणि विद्यार्थ्यांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कॉकरोच जनता पार्टीने केले आहे.

## नाशिकमध्ये पावसाचा हाहाकार; रामकुंड परिसरात रेस्क्यू ऑपरेशनचा थरार

**● नाशिक । वीरभूमी–** नाशिकमध्ये पावसाचा हाहाकार सुरू आहे. जिल्ह्याला हवामान विभागाने यलो अलर्ट दिला आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही मुसळधार पाऊस सुरू आहे. यामुळे गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढला आहे. रात्रीतूनच पाण्याचा प्रवाह आणि पाणी पातळी वाढल्याने गोदावरी नदीला पूर आला आहे. रामकुंड परिसरात पूरस्थितीमुळे नेपाळचे दोन पर्यटक अडकले.

रामकुंड परिसरातील गांधी ज्योतच्या खाली हे तरुण अडकले होते. रात्री गांधी ज्योतच्या वर हे पर्यटक थांबले होते. रात्री पाण्याची पातळी वाढल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. सकाळी गोदावरीला पूर आल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी मदतीसाठी आवाहन केले. या ठिकाणच्या एका तरुणाला बाहेर काढण्यात यश आले आहे.

सकाळी काही तरुणांनी रेस्क्यू टीमला ही बाब कळवली. त्यानंतर या तरुणासह नेपाळच्या पर्यटकाला पाण्याच्या वाढलेल्या प्रवाहातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. अग्निशमन दल आणि जीवरक्षक दलाच्या जवानांनी रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले. त्यासाठी लाईफ जॅकेटसह टायर आणि दोरीचा वापर करण्यात आला. या आयुधासह रेस्क्यू ऑपरेशन राबवण्यात आले.

अग्निशमन दल आणि जीवरक्षक दलाने गांधी ज्योतपर्यंत दोरखंड बांधला. त्या माध्यमातून तरुणासह पर्यटकाला बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. पाण्याचा प्रवाह पाहता दोघांना वाचवण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन राबवण्यात आले. हा थरार पाहण्यासाठी लोकांनी गोदाकाठावर गर्दी केली होती. तर पर्यटकांच्या चेहऱ्यावर भीती स्पष्टपणे दिसत होती.

रामकुंड परिसरात अडकलेल्या तरुणाला जवानांनी बाहेर काढले. गोदावरीत अचानक पाणी वाढल्याने हा तरुण आणि पर्यटक अडकला होता. गांधी ज्योतच्या खाली हा तरुण अडकला होता. अग्निशमन दल आणि जीवरक्षक दलाच्या जवानांनी तरुणाला बाहेर काढले. संततधार पावसामुळे नाशिकच्या गोदावरीला पूर आला आहे. तर यापूर्वी एका नेपाळच्या पर्यटकाला अग्निशमन दल आणि जीवरक्षक दलाच्या जवानांनी बाहेर काढले होते. गोदावरीला पूर आल्याने पर्यटकांसह नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

## विद्यार्थ्यांसाठी अण्णा हजारे मैदानात

### दडपशाही नव्हे, संवाद हवा । मौन आंदोलन सुरु

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** नीट पेपरफुटीवरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी विद्यार्थी आणि विरोधी पक्ष आक्रमक झाले आहेत. विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनावर २० जुलै रोजी पोलिसांनी लाठीचार्ज केला. एकीकडे दिल्लीत सोनम वांगचुक उपोषणाला बसले आहेत. तर दुसरीकडे आता महाराष्ट्रातही अण्णा हजारेंनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. अण्णा हजारे यांनी नगरमध्ये मौन आंदोलनाला सुरुवात केली आहे. दडपशाही नव्हे, तर संवाद हवा, असा संदेश अण्णा हजारे यांनी सरकारला दिला आहे.



नवी दिल्लीच्या जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर समाजसेवक अण्णा हजारे यांनी मौन आंदोलनाला सुरुवात केली आहे. त्यांनी सकाळी अहिल्यानगरमधील वाडिया पार्क येथील गांधी स्मारकात आंदोलनाला सुरुवात केली. आंदोलनाआधी त्यांनी सरकारकडून दडपशाही नव्हे, तर संवाद हवा, अशी भूमिका बॅनरच्या मार्फत स्पष्ट केली. सरकारने संवाद साधून प्रश्न सोडवायला हवेत, अशी मागणी देखील त्यांनी केली. लोकशाहीत दडपशाहीऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारला पाहिजे, असे आवाहन देखील केले. यावेळी आंदोलनस्थळाला प्रतीकात्मक स्वरूपात 'नगरचे जंतर-मंतर' नाव दिल्याचे जाहीर केले. अण्णा हजारे यांचे मौन आंदोलन चर्चेत आले आहे.

या आंदोलनादरम्यान अण्णा हजारे यांच्या डोळ्यांत अश्रू देखील आले. अण्णा हजारे यांनी आंदोलनाआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक पत्र लिहिले. अण्णा हजारे यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून सरकारच्या दडपशाहीविषयी चिंता व्यक्त केली. अण्णा हजारे यांनी म्हटले की, 'नीट पेपरफुटी, बेरोजगारी, भरती प्रक्रियांवरून चिंता व्यक्त केली. विद्यार्थ्यांचे आंदोलन हे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नव्हे. तर लोकभावनेचा विषय म्हणून पाहिले पाहिजे. सरकारने विद्यार्थी आणि आंदोलकांशी संवाद करावा, असे म्हणत त्यांनी लोकशाही मूल्याची आठवण करून दिली'. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाकडे विरोधकांसहित विरोधकांचेही लक्ष असणार आहे.

# 'चरणसेवा'ने जपले ४.९६ लाखांहून अधिक वारकऱ्यांचे आरोग्य

**● मुंबई । वीरभूमी –** गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. यंदाच्या आषाढी वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी थेट चरणसेवा आणि आरोग्यसेवेचे लाभ घेतला.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी सात जिल्ह्यांमध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा यंदा विस्तार करून तो दिंडी मार्गावरील १४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

या चौदा जिल्ह्यांत उपक्रम :

सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, वाशिम, सांगली, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील १४० मुक्कामस्थळांवर सेवा केंद्रे उभारण्यात आली. या केंद्रांमधून वारकऱ्यांना चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, प्रथमोपचार, आवश्यक औषधांचे वितरण, रुग्णवाहिका सुविधा तसेच गरजेनुसार पुढील उपचारांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली.

या उपक्रमात १६४ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. ७ हजार ५३८ स्वयंसेवक तसेच ११ हजार ३३१ डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाकार्यात योगदान दिले.





सेवेसाठी १० हजार टी-शर्ट आणि ३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा उपयोग चरणसेवेसाठी करण्यात आला. तसेच ८ रथांद्वारे जनजागृती करण्यात आली. लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या या उपक्रमातून तब्बल ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांना प्रत्यक्ष चरणसेवा आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

आरोग्य जनजागृती रथांद्वारे स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, रक्तदान, अवयवदान संदर्भात जनजागृती, निरोगी जीवनशैली तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती वारकऱ्यांपर्यंत आरोग्य रथाच्या माध्यमातून पोहोचविण्यात आली.

> राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ४ लाख ९६ हजारांपेक्षा अधिक वारकऱ्यांपर्यंत 'चरणसेवा' पोहोचविता आली, याचा आनंद आहे. या उपक्रमाच्या यशामागे लोकसहभाग हीच सर्वात मोठी ताकद ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेला विविध आरोग्य संस्था, दानशूर व्यक्ती, डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवकांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्यामुळे हे सेवाकार्य यशस्वी झाले.
>
> – **रामेश्वर नाईक,** कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी

# SPOT NEWS

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त पुतळा सुशोभीकरणाची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर येथील त्यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण व परिसराची स्वच्छता करण्यात यावी, या मागणीसाठी सकल मातंग समाज, अहिल्यानगरच्या वतीने महापालिका आयुक्त, महापौर तसेच अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सिद्धार्थनगर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पॉलिश करून स्मारकाची रंगरंगोटी करण्यात यावी. तसेच फुलांची आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई, मंडप, स्टेज व ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करण्यात यावी. जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुतळा परिसर व आजूबाजूचा परिसर महापालिकेच्या माध्यमातून स्वच्छ करून आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी सकल मातंग समाजाचे अंकुश मोहिते, पप्पू पाटील, याकोब वडागळे, येसुदास वाघमारे, प्रल्हाद भालेराव, अनिल वाघमारे, तेजस साठे, संकेत पवार, सिद्धांत ससाणे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कामगारांच्या मुलांची शिष्यवृत्ती बंद केल्याच्या निषेधार्थ ३ ऑगस्टला आंदोलन

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्यातील बांधकाम व इतर कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांमध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे कामगारांवर मोठा अन्याय होत असल्याचा आरोप लोकशाही बांधकाम कामगार व इतर कामगार संघटना (महाराष्ट्र राज्य) यांनी केला आहे. विशेषतः कामगारांच्या मुलांसाठी देण्यात येणारी शैक्षणिक शिष्यवृत्ती बंद करण्यात आल्याने हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होणार असल्याचा दावा संघटनेने केला आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ येत्या ३ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगारमंत्री आकाश पुंडकर यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात येणार असल्याचा इशारा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव भैलुमे यांनी दिला. यासंदर्भात संघटनेच्या वतीने सहाय्यक कामगार आयुक्त तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राज्य सरकारला निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात कामगारांच्या हिताच्या योजनांमध्ये करण्यात आलेले बदल तातडीने मागे घेऊन पूर्वीप्रमाणे सर्व योजना सुरू ठेवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, बांधकाम कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी मिळणारी शिष्यवृत्ती बंद झाल्यामुळे अनेक गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर मोठा आर्थिक भार पडणार आहे. शिक्षणासाठी लागणारा खर्च उचलणे अनेक कामगारांना शक्य होणार नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे हा निर्णय कामगारांच्या मुलांच्या भवितव्याशी खेळणारा असून तातडीने रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संघटनेने असा आरोपही केला आहे की, कामगारमंत्री आकाश पुंडकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कामगारांसाठीच्या विविध योजनांवर नवीन अटी व निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे अनेक पात्र कामगारांना योजनांचा लाभ मिळणे कठीण झाले असून शासनाच्या निर्णयांमुळे कामगारांवर अन्याय होत आहे. कामगारांच्या सामाजिक आणि शैक्षणिक हिताला बाधा पोहोचविणारे हे शासन निर्णय त्वरित मागे घेऊन कामगारांना न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. या मागण्यांकडे राज्य सरकारने तातडीने लक्ष दिले नाही, तर ३ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगारमंत्री आकाश पुंडकर यांच्या पुतळ्याचे दहन करून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

# पेमगिरी येथील बारवेतील शिलालेख उजेडात

**पूर्वजांच्या स्मरणार्थ आणि धर्मकार्यासाठी बांधलेली बारव | तत्कालीन ग्रामीण समाजजीवनाचा अभ्यास करण्यास उपयुक्त**

■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील पेमगिरी गावातील किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या प्राचीन बारवेत कोरलेला आहे. सहा ओळींचा हा कोरीव शिलालेख देवनागरी लिपीत मराठी भाषेत असून, काही अक्षरे झिजली असली तरी छापाच्या आधारे वाचन स्पष्ट होते.

**शिलालेखाचे वाचन :–**

**१) श्री गणपती चरण नीवास तायाजी सुत वाणोजी मोक**

**२) दम कुळीगउर पूर्वजांस सोमवंसी सुध प्रकास उ**

**३) पनाम डुबे जगप्रकास ग्राम पेमगीर सुखेवास**

**४) वीहीर बांधली पोणे भावार्थ अधिकार धर्मकार्यार्थ स**

**५) के १६२८ व(व्य)या नामा संवछरे स्रावन सुध पाडवा**

**६) वीहीरीचे काम पोणे व प्रे(म)गाव मिळोनः शुभं भवतु:**

**अर्थ :** या शिलालेखानुसार पेमगिरी येथील तायाजी यांचे पुत्र वाणोजी मोकदम यांनी पूर्वजांच्या स्मरणार्थ आणि धर्मकार्यासाठी ही बारव बांधली. शालिवाहन शक १६२८, व्ययनाम संवत्सर, श्रावण शुद्ध पाडवा (२९ जुलै १७०६) रोजी हे कार्य पूर्ण झाल्याची नोंद आहे. बारवेचे काम दोन गावांच्या सहकार्याने पूर्ण झाल्याचे नमूद करून शेवटी शुभं भवतु असा मंगलाशय व्यक्त करण्यात आला आहे.

**शिलालेखाचे महत्त्व :** हा शिलालेख मराठाकालीन जलव्यवस्था, लोककल्याण, धर्मदान आणि स्थानिक प्रशासनाचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पुरावा आहे. मोकदम पदाचा उल्लेख, ग्रामसहकार्याची परंपरा आणि सार्वजनिक पाण्याच्या व्यवस्थेसाठी केलेले दान यांमुळे तत्कालीन ग्रामीण समाजजीवनाचा अभ्यास करण्यास हा लेख अत्यंत उपयुक्त ठरतो. तसेच छत्रपती ताराराणी यांच्या कारकिर्दीतील सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावरही तो प्रकाश टाकतो.

या शिलालेखाचे संशोधन, माहिती व वाचन पुणे येथील अनिल दुधाणे यांनी केले आहे त्यांना अनिकेत रजपूत यांनी सहकार्य केले आहे.



■ छाया । विजय उंडे



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

## अकोलेचे डॉ. विष्णू गणपती आंबी २०२६ च्या महा ॲक्युपंक्चर रत्न पुरस्काराने सन्मानित

● **अकोले । वीरभूमी –**

अकोले येथील जेष्ठ ॲक्युपंक्चरीस्ट प्राध्यापक डॉ. विष्णू गणपती आंबी यांना आयुष इंटरनेशनल मेडीकल असोसिएशन यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा महा ॲक्युपंक्चर रत्न पुरस्कार २०२६ देऊन गौरविण्यात आले. ॲक्युपंक्चर उपचार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, अध्ययन, प्रचार, प्रसार, रुग्णसेवा तसेच सामाजिक व समाजउपयोगी योगदानाची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांचे हस्ते डॉ. विष्णू आंबी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी डॉ. बाबुराव कानडे (राष्ट्रीय अध्यक्ष आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन) ,डॉ. नितीनराजे पाटील (व्हा.चेअरमन, आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन), अध्यक्ष डॉ. सतिश कराळे, कार्यकारिणी सदस्य डॉ. अभिजीत कवठकर, प्रशांत सावंत, दिशा चव्हाण, विजय नवल पाटील, तुषार वाटधूळे, ज्येष्ठ बंधू डॉ. भानुदास आंबी हे आवर्जुन उपस्थित होते.

या पुरस्काराबद्दल त्यांचे मातोश्री गंगुबाई शिंदे ॲक्युपंक्चर मेडिकल कॉलेजचे डॉ. अनिल रहाणे, अध्यापक वर्ग आणि विद्यार्थी तसेच अकोले तालुका मेडिकल असोशिएशनने त्यांचे अभिनंदन केले आहे.


## बोल्हेगाव स्वामी समर्थ केंद्रात २५ हजार भाविकांचे सामूहिक स्वामी चरित्र पारायण

**रविवारी सकाळी ८ ते ११ या वेळेत सोहळा | सर्व वयोगटातील भाविकांनी सहभागी व्हावे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर येथील बोल्हेगाव फाटा परिसरातील संत तुकाराम नगर येथील स्वामी समर्थ केंद्र (दिंडोरी प्रणित) येथे रविवारी (दि. २६ जुलै) सकाळी ८ ते ११ या वेळेत २५ हजार भाविकांच्या उपस्थितीत सामूहिक स्वामी चरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

केंद्राचे प्रमुख चंद्रशेखर काका लोळगे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम साकारला जात आहे. सुमारे २५ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या केंद्रात सुरुवातीला परिसरातील विरळ वस्तीमुळे भाविकांची संख्या मर्यादित होती. मात्र, कालांतराने या केंद्रात भाविकांचा ओघ वाढू लागला. व्यसनाधीनतेच्या आहारी जाण्याच्या तसेच नैराश्येच्या मार्गांवर असलेल्या तरुण पिढीला स्वामींचे विचार भावले. साहजिकच या केंद्रात सेवा देणाऱ्यांची संख्या वाढू लागली. जवळ कमी पैसे



असतानाही व्यसनांचा मार्ग न अवलंबविता अनेक तरुणांनी अध्यात्मात झोकून देत उद्योग–व्यवसाय करण्यात व नोकरी मिळविण्यात यश मिळविले.

केंद्रातील बालसंस्कार विभागासह १८ विविध विभागांच्या माध्यमातून समाजप्रबोधन व सर्वंकष समाज घडविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. त्यामुळे आज या केंद्रात सर्व स्तरांतील भाविकांची मोठी वर्दळ असते. बोल्हेगाव परिसरातील वाढत्या नागरी वस्तीबरोबरच जिल्हा व परजिल्ह्यातील भाविकही येथे नियमित येत असतात. विशेषतः गुरुवार आणि रविवार या दिवशी येथे मोठी गर्दी होत असते. अनेक भाविकांना स्वामींच्या सेवेची अनुभूती मिळाली असून, भरकटलेल्या अनेकांना सन्मार्गावर आणण्याचे कार्य या केंद्राच्या माध्यमातून घडल्याचे समाधान चंद्रशेखर काका लोळगे यांनी व्यक्त केले.

या पार्श्वभूमीवर बोल्हेगाव फाटा येथील स्वामी समर्थ केंद्रात रविवारी (दि. २६ जुलै) रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत २५ हजार भाविकांचा सामूहिक स्वामी चरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात आला असून, त्यात आबाल–वृद्धांसह सर्व वयोगटातील भाविकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन चंद्रशेखर काका लोळगे यांनी केले आहे.

# विठ्ठलनामाच्या गजरात केडगावच्या सरस्वती विद्यालयात रंगली पंढरीची वारी

**महाराष्ट्राची संतपरंपरा, संस्कृती आणि सामाजिक मूल्ये नव्या पिढीत रुजावी : मुख्याध्यापक संदीप भोर**

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर केडगाव येथील सरस्वती प्राथमिक विद्या मंदिरात विठ्ठलनामाच्या अखंड गजरात, टाळ–मृदंगाच्या निनादात आणि भक्तीमय वातावरणात 'पंढरीची वारी, वृक्षदिंडी आणि शिक्षणाची वारी' हा आगळावेगळा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. बालवाडी ते दहावीपर्यंतच्या सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी वारकरी बनत महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, संस्कारांचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला.

विठ्ठल–रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, मुक्ताबाई, प्रभू श्रीराम, सीता, लक्ष्मण तसेच विविध संतांच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात विणा, मुखी विठ्ठलनाम आणि पावलोपावली हरिनामाचा गजर अशा भक्तिरसात न्हालेल्या दिंडीने परिसर भक्तिमय बनला होता.

दिंडीतून झाडे लावा–झाडे जगवा,एक बाळ–एक झाड,पंढरीची वारी, वृक्षदिंडी आणि शिक्षणाची वारी अशा घोषणांद्वारे पर्यावरण संरक्षण, संस्कार आणि शिक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. नागरिकांनी ठिकठिकाणी दिंडीचे पुष्पवृष्टी करून उत्स्फूर्त स्वागत केले.

सरस्वती विद्यालयातून निघालेली ही दिंडी मोहिनीनगर मार्गे केडगाव देवी प्रांगणात पोहोचली. तेथे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी फुगडीचा आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी आकर्षक रिंगण साकारत पर्यावरण संवर्धनाची गीते सादर केली. भक्ती आणि संस्कारांचा संगम अनुभवत परिसर विठ्ठलमय झाला.

यावेळी मुख्याध्यापक संदीप भोर म्हणाले, महाराष्ट्राची संतपरंपरा, संस्कृती आणि सामाजिक मूल्ये नव्या पिढीत रुजावीत, या हेतूने दरवर्षी या दिंडीचे आयोजन केले जाते. शाळा कोणत्याही माध्यमाची असो, विद्यार्थ्यांना संस्कारांचे बाळकडू देणे ही प्रत्येक शैक्षणिक संस्थेची जबाबदारी आहे. सरस्वती विद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच भारतीय संस्कृतीची जपणूकही केली जाते.

नगरसेवक मनोज कोतकर यांनी सांगितले की, शिक्षणासोबत संस्कार, पर्यावरण संवर्धन आणि वारकरी परंपरेचे जतन करणारा हा उपक्रम समाजासाठी आदर्श आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण होतो. नगरसेवक मयूर बांगरे म्हणाले की, आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. पंढरीची वारी, वृक्षदिंडी आणि शिक्षणाची वारी यांचा सुंदर संगम घडवून सरस्वती विद्यालयाने इतर शाळांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.



दिंडीचा समारोप केडगाव देवी प्रांगणात भक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला. समारोपानंतर विद्यार्थ्यांनी 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. विठ्ठलभक्ती, संतसंस्कार, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देणाऱ्या या आगळ्यावेगळ्या दिंडी सोहळ्याने उपस्थितांच्या मनात भक्तीचा, संस्कारांचा आणि समाजसेवेचा दीप प्रज्वलित केला.

या दिंडी सोहळ्याप्रसंगी नगरसेवक मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, नगरसेविका कमलताई कोतकर, उद्योजक जालिंदर कोतकर, माजी नगरसेवक संभाजी पवार, प्रा.डॉ. रविंद्र चोभे, सहकार्यवाह डॉ. हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान मा. प्रा डॉ दादासाहेब काजळे, अवि साठे, सुमन पाटील, सुमन कदम, सुमन गावडे, लंका आव्हाड, प्रियंका सातपुते, किसनाबाई बनकर, जयश्री काळे, यमुना अंकुश कोल्हे, रोहिणी राऊत, रोहिणी कांबळे आदींसह शिक्षक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SPOT NEWS

## लाठीचार्जचा निषेधार्थ पीपल्स रिपब्लिकचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या कथित लाठीचार्ज व अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केल्याच्या घटनेचा निषेध करत पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात संबंधित घटनेची सखोल व निष्पक्ष कायदेशीर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच नीट (छएएढ), विविध शासकीय भरती परीक्षा आणि शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ) यांसह विविध स्पर्धा परीक्षांचे वारंवार पेपरफुटीचे प्रकार समोर येत असल्याने त्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या अनियमिततेची जबाबदारी निश्चित करून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड, किरण गायकवाड, गौतम म्हस्के, महिला जिल्हाध्यक्ष गौतमीताई भिंगारदिवे, सुरेश भिंगारदिवे, युवक जिल्हाध्यक्ष सागर ठोकळ, मंगल पालवे, प्रशांत भिंगारदिवे, अनिकेत विधाते, लता बर्डे, लतिका पाटोळे, कविता भिंगारदिवे, राधा पाटोळे, सुनीता धनवटे, सुमन काळापहाड, नयन खंदारे, किरण शिंदे, महिला शहर जिल्हाध्यक्ष जयश्री गायकवाड, सिद्धांत गायकवाड, सारिका गांगुर्डे, माया जाधव, ज्योती साठे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सावेडीत २९ जुलै रोजी 'गुरु पौर्णिमा महोत्सवा'चे आयोजन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
परमपूज्य सद्गुरु ओशो रजनीश यांच्या दिव्य विचारांचा आणि आध्यात्मिक वारशाचा जागर करत सावेडी येथील एकवीरा चौक परिसरातील 'शांतिकुटीर' येथे बुधवार, दिनांक २९ जुलै रोजी भव्य 'गुरु पौर्णिमा महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. योग जागृती केंद्र आणि कॉस्मिक आर्ट अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा सोहळा कृतज्ञता, प्रेम आणि समर्पणाच्या भावनेने साजरा होणार आहे. हा सोहळा सायंकाळी ६:३० ते रात्री ८:३० या वेळेत संपन्न होईल. या महोत्सवाचे मुख्य सूत्र "Insight Intuition' (अंतर्दृष्टी व अंतःप्रेरणा) आणि "Self-knowledge' (आत्मज्ञान) हे असून, स्वामी आत्मो कुटीर हे उपस्थितांना विशेष मार्गदर्शन व ध्यानसाधना करवून घेणार आहेत. आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या आणि सत्याचा मार्ग दाखवणाऱ्या सद्गुरु ओशो रजनीश यांच्या प्रकाशाचा उत्सव साजरा करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हा सोहळा सर्वांसाठी पूर्णपणे खुला असून वृद्धेश्वर कॉलनी, संदीपनी अकॅडमीच्या मागे, एकवीरा चौक, सावेडी, अहिल्यानगर येथील 'शांतिकुटीर' येथे पार पडेल. तरी अहिल्यानगरमधील सर्व नागरिकांनी, ओशो प्रेमींनी, साधकांनी आणि अध्यात्मप्रेमींनी या महोत्सवाचा व ध्यानसाधनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी आत्मो कुटीर यांनी केले आहे.

# श्रीगोंद्यात विद्यार्थ्यांचा शिक्षण धोरण व पेपरफुटीविरोधात मोर्चा

### छत्रपती महाविद्यालय ते तहसील कार्यालय असा काढला भव्य मोर्चा । केंद्र सरकारविरोधात तीव्र घोषणाबाजी

**श्रीगोंदा । वीरभूमी -**
केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणाविरोधात, विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांचा निषेध नोंदवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी श्रीगोंद्यात गुरुवारी स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी आणि महाविद्यालयीन युवक-युवतींनी छत्रपती महाविद्यालय ते तहसील कार्यालय असा भव्य मोर्चा काढला.

मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत पेपरफुटीमुळे नैराश्यात जाऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच अशा घटनांबाबत सरकारने दाखविलेल्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला.


छाया । विजय उंडे

यावेळी टिळक भोस, स्मितल वाबळे, नाना शिंदे, दिग्विजय नागवडे, जहीर जकाते, सतीश बोरुडे शिवराज ताडे तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनींनी संतप्त मनोगते व्यक्त करत केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणावर व परीक्षा व्यवस्थेवर कठोर टीका केली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

यानंतर तहसीलदार सचिन डोंगरे यांना निवेदन देऊन विद्यार्थ्यांनी प्रमुख मागण्या मांडल्या. त्यामध्ये नीट घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, जंतर-मंतरवरील आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील हल्ल्याचा निषेध करून दोषींवर कारवाई करावी, लोकसेवा चआयोगाच्या परीक्षा कायमस्वरूपी ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात व ७५ हजार पदांची भरती प्रक्रिया तातडीने राबवावी, सर्व प्रलंबित नोकरभरती त्वरित पूर्ण करावी, पोलीस भरतीसाठी वयोमर्यादा वाढवावी तसेच जातनिहाय जनगणना करण्यात यावी अशा प्रमुख मागण्यांचा समावेश होता.

या आंदोलनात श्रीगोंदा तालुक्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, विविध महाविद्यालयांतील युवक-युवती आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांच्या शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला.

## शहरात जिल्हास्तरीय 'नशा मुक्त भारत' या विषयावर विविध स्पर्धांचे आयोजन

**अहिल्यानगर । वीरभूमी -**
भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या मेरा युवा भारत अहिल्यानगर व सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट (सीएसआरडी) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात 'युवा शक्ती, नशा मुक्त भारताची शक्ती' या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, सर्जनशीलतेला चालना देणे आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना दृढ करणे हा असून, या स्पर्धेत युवक-युवतींना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा २९ जुलै रोजी शहरातील सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट (सीएसआरडी) महाविद्यालय येथे होणार आहे. जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील सर्व युवक-युवती या स्पर्धांमध्ये वैयक्तिक अथवा गट स्वरूपात सहभागी होता येणार आहे.

स्पर्धांमध्ये लोकगीत (संगीत), नृत्य, नुक्कड नाटक/माईम, चित्रकला, वादविवाद, लघुपट/रील, घोषवाक्य लेखन तसेच कविता/स्लॅम पोएट्री अशा विविध कला व साहित्य प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व स्पर्धांचा विषय 'नशा मुक्त भारत' हा असून युवकांनी व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश आपल्या कलाकृतीतून मांडायचा आहे.

स्पर्धेतील उत्कृष्ट विजेत्यांना अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. इच्छुकांनी माय भारत या पोर्टलवर नोंदणी करून संबंधित विभाग निवडून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अर्ज सादर करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमामुळे युवकांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार असून समाजात व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश पोहोचण्यास मदत होणार आहे.

## लोणी व्यंकनाथ येथील दोन चिमुकल्यांचा मृत्यू

### वेळेवर अॅम्ब्युलन्स न मिळाल्याने संताप । शेततळ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर

**श्रीगोंदा । वीरभूमी-**
श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे घडलेल्या अत्यंत दुर्दैवी घटनेत कांडेकर कुटुंबातील आनंदी अनिल कांडेकर (वय ३ वर्षे) आणि वीरा प्रवीण कांडेकर (२.५ वर्षे) या दोन चिमुकल्या चुलत बहिणींचा शेततळ्यात पडून मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण गाव शोकमग्न झाले असून, ग्रामीण भागातील आपत्कालीन आरोग्यसेवा आणि शेततळ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

घटना घडल्यानंतर ग्रामस्थांनी तत्परता दाखवत दोन्ही मुलींना शेततळ्यातून बाहेर काढले आणि तातडीने लोणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधून म्ब्युलन्सची मागणी केली. मात्र तेथील डॉक्टरांनी म्ब्युलन्स देऊ शकत नसल्याचे कारण सांगितल्याने उपचारासाठी मौल्यवान वेळ वाया गेला आणि दोन निष्पाप जीव काळाच्या



पडद्याआड गेले.

या घटनेनंतर ग्रामस्थांनी संबंधित वैद्यकीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, घटनेची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, ही घटना केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांवरील प्रश्न अधोरेखित करणारी आहे. अनेक शेततळी आजही संरक्षक कठडे, सुरक्षित कुंपण किंवा इशारा फलकांशिवाय आहेत. त्यामुळे लहान मुले, जनावरे आणि नागरिकांच्या जीविताला सातत्याने धोका निर्माण होत आहे. दुसरीकडे, आपत्कालीन परिस्थितीत १०८ म्ब्युलन्स सेवा वेळेत उपलब्ध न होण्याबाबतही वारंवार तक्रारी समोर येत आहेत.

**अशा घटना रोखण्यासाठी प्रयत्नाची गरज**

■ ग्रामीण भागातील प्रत्येक शेततळ्याभोवती संरक्षण कठडे किंवा सुरक्षित कुंपण उभारणे, धोक्याचे फलक लावणे तसेच १०८ आपत्कालीन आरोग्यसेवा अधिक सक्षम व तत्पर करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा अशा निष्पाप चिमुकल्यांचे जीव जाण्याच्या दुर्दैवी घटना थांबविणे कठीण ठरेल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## सोमवार पासून फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित ८ व्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला होणार प्रारंभ

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देणाऱ्या आणि प्रतिष्ठेच्या फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित ८ व्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला सोमवार, २७ जुलै पासून अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर प्रारंभ होत आहे. सकाळी १०.३० वाजता फुटबॉल स्पर्धेचा थरार रंगणार आहे. ही स्पर्धा अहमदनगर महाविद्यालयाच्या सौजन्याने व अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनचे मुख्य विश्वस्त व फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया तसेच शिवाजियन्स स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष व फुटबॉल असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या विशेष पुढाकाराने पार पडत आहे.

शालेय स्तरावरील फुटबॉलला चालना देणे, गुणवंत खेळाडूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जिल्ह्यात फुटबॉल संस्कृती अधिक बळकट करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

स्पर्धेचे उद्घाटन सहभागी शाळांच्या कर्णधारांच्या हस्ते होणार असून, यावेळी अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य, फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर तसेच अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यंदाच्या स्पर्धेत ५३ संघ सहभागी होत असून १२ वर्षांखालील मुले, १४ वर्षांखालील मुले, १६ वर्षांखालील मुले आणि १६ वर्षांखालील मुली अशा चार गटांत १०० हून अधिक सामने खेळविण्यात येणार आहेत.

लीग-कम-नॉकआऊट पद्धतीने आयोजित होणारी विभागातील ही एकमेव आंतरशालेय फुटबॉल स्पर्धा असून प्रत्येक संघाला साखळी फेरीत आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. उत्तम नियोजन, शिस्तबद्ध आयोजन, दर्जेदार पंच व्यवस्था, खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा आणि व्यावसायिक व्यवस्थापन यामुळे या स्पर्धेने राज्यातील शालेय फुटबॉलमध्ये वेगळे स्थान निर्माण केले असून, ही स्पर्धा जिल्ह्यातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या स्पर्धांपैकी एक म्हणून ओळखली जाते.

अहमदनगर महाविद्यालयाने आपले फुटबॉल मैदान उपलब्ध करून दिल्यामुळेच एवढ्या मोठ्या स्वरूपातील स्पर्धेचे आयोजन शक्य झाले आहे. त्यांच्या या मोलाच्या सहकार्याबद्दल आयोजकांनी महाविद्यालय व्यवस्थापनाचे आभार व्यक्त केले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्याच्या फुटबॉलचे उज्ज्वल भविष्य घडविण्याच्या या उपक्रमाला सर्व फुटबॉलप्रेमी, क्रीडाप्रेमी, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून युवा खेळाडूंना प्रोत्साहन व पाठिंबा द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धेच्या नियोजन व आयोजनासाठी फुटबॉल असोसिएशनचे सचिव रौनप फर्नांडिस, मुख्य आयोजन समितीचे सदस्य पल्लवी सैंदाणे, राजेश अँथनी, अभिषेक सोनवणे, अभय साळवे, जेव्हिअर स्वामी आणि सचिन पात्रे, तसेच फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी व शिवाजियन्स स्पोर्ट्स क्लबचे सदस्य, प्रशिक्षक व खेळाडू स्पर्धेसाठी परिश्रम घेत आहे.

## विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ

# शेवगावात कडकडीत बंद

### वंचित बहुजन आघाडीसह विविध पक्षांचा मोर्चा

**शेवगाव । वीरभूमी-**
दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला शेवगाव शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गुरुवारी शहर कडकडीत बंद ठेवून केंद्र सरकार व दिल्ली पोलिसांविरोधात निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी क्रांती चौकात आयोजित सभेत वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन चव्हाण म्हणाले, देश संविधानावर चालतो, हुकूमशाहीवर नाही. लोकशाही मूल्यांवर आघात करणाऱ्या प्रवृत्तीला जनता योग्य वेळी उत्तर देईल. विद्यार्थ्यांवरील कारवाई लोकशाहीला घातक असून ती जनतेला मान्य नाही.

सभेला शिवसेना (उबाठा)चे तालुकाप्रमुख ड. अविनाश मगरे, अजिंक्य लव्हाट, कानिफनाथ कर्डीले, उदय गांगुर्डे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख, संजय लहासे, रमेश खरात,



छाया । अमोल कराळे

कम्युनिस्ट पक्षाचे बबनराव पवार, दत्ता आरे गुरुजी, इथापे, शिवाजी मडके, विजय हुसळे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर सकाळी १० वाजता क्रांती चौकातून वंचित बहुजन आघाडी, शिवसेना (उबाठा), कम्युनिस्ट पक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना व अन्य संघटनांच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. मोर्चामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, भारतीय संविधानाची प्रत, तिरंगा तसेच विविध पक्षांचे झेंडे आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या निषेधाचे फलक हातात घेऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक, मोची गल्ली, आखेगाव रस्ता, तिसगाव रस्ता, मिरी रस्ता व नेवासा रस्ता परिसरात बंदचे आवाहन करण्यात आले.

व्यावसायिकांनी शंभर टक्के प्रतिसाद देत दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला. या आंदोलनादरम्यान पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# जंतर-मंतर लाठीचार्जच्या निषेधार्थ पारनेरमध्ये धरणे आंदोलन

## विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईचा काळ्या फिती लावून निषेध । लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याची सर्वपक्षीयांची मागणी

**● पारनेर । वीरभूमी –**
नवी दिल्लीतील ऐतिहासिक जंतर-मंतर येथे न्यायाच्या मागणीसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ पारनेर व परिसरातील विविध सामाजिक, पुरोगामी, विद्यार्थी आणि कामगार संघटनांच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ पारनेर शहरातील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यासमोर सर्वपक्षीय कार्यकर्ते व नागरिकांनी काळ्या फिती लावून धरणे आंदोलन केले.

यावेळी आंदोलकांनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला, विशेषतः युवकांना, शांततापूर्ण मार्गाने आपले मत व्यक्त करण्याचा आणि न्याय मागण्याचा मूलभूत अधिकार भारतीय संविधानाने दिला आहे. मात्र, दिल्लीत घडलेल्या घटनेमुळे लोकशाही मूल्यांची पायमल्ली झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. शिक्षण व भविष्याची चिंता करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेली कारवाई निषेधार्ह असून, सत्तेच्या बळावर विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न लोकशाहीसाठी घातक असल्याचे मत उपस्थितांनी मांडले.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यासमोर झालेल्या आंदोलनात सरकारच्याभूमिकेविरोधातघोषणाबाजी करण्यात आली. आंदोलकांनी हातात फलक घेत काळ्या फिती लावून मूक आंदोलन केले. विद्यार्थ्यांच्या हक्कांवर व सुरक्षिततेवर होणारे हल्ले सहन केले जाणार नाहीत, असा ठाम संदेश या आंदोलनातून प्रशासन व शासनाला देण्यात आला.

या आंदोलनात श्रीकांत पठारे, निलेश खोडदे, वैभव गायकवाड, रा. या. औटी, अमित जाधव, सतीश म्हस्के, ॲड. गणेश कावरे, राजू शेख, बाळासाहेब औटी, सहदेव तराळ, शंकर नगरे, राजेंद्र करंदीकर, राजू शेरकर, बाळासाहेब मते, चंद्रकांत कावरे, मयूर कावरे, विनोद गोळे, अविनाश औटी, संभाजी थोरे, निलेश वाखारे, सचिन नगरे, अमोल ठुबे, शत्रुघ्न नवघणे, मधुकर साळवी, संपत पवार, सरपंच अमोल दुधाडे, किसन सुपेकर, डॉ. मुजाहिद सय्यद, शिवाजी लाळगे, संदीप मोढवे, दत्ता कावरे, नितीन आहेर, शुभम पाडळे, राहुल बुगे, संतोष चेडे, सतीश औटी, दिनेश कावरे, अतुल शेटे, अभिषेक औटी,



■ छाया । भगवान गायकवाड

अर्जुन खोडदे, बाळासाहेब औटी तसेच पारनेर परिसरातील विविध पुरोगामी संघटना, विद्यार्थी संघटना, कामगार संघटनांचे प्रतिनिधी, महिला, तरुण व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नीट पेपरफुटी, शिक्षणातील भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ भिंगार शहर बंद; वंचितचे आंदोलन



**● अहिल्यानगर । वीरभूमी-**
नीट परीक्षा पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार तसेच दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भिंगार शहरासह अहिल्यानगर शहरातील विविध भागांत बंद पाळण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्यांना शांततेच्या मार्गाने दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले.

राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली व पक्षाच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. नीट परीक्षा पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी दिल्लीतील जंतर-मंतर व संसदेसमोर देशभरातील विद्यार्थी, युवक व पालकांनी शांततापूर्ण आंदोलन केले होते. मात्र या आंदोलनाकडे दुर्लक्ष करून आंदोलकांवर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

या कारवाईत अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा तसेच काही आंदोलकांना अटक करून त्यांच्याशी गैरवर्तन करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेली कारवाई निषेधार्ह असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी सरकारने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष हनिफ शेख, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे, युवा जिल्हा उपाध्यक्ष दीपक ससाणे, प्रवीण ओरे, सुहास धीवर, सुरेश पानपाटील, देविदास भालेराव, सुधीर धामणे, ड. योगेश गुंजाळ, कर्जत तालुकाध्यक्ष पोपट शेटे, चंद्रकांत नेटके, अंकुश साळवे, जीवन कांबळे, संकेत शिंदे, प्रतीक ठोकळ, संजय शेलार, राजीव भिंगारदिवे, अमर निरभवने, बाजीराव राजगुरू, संध्या मेढे, अविनाश साठे, आढाव यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळेतील बालगोपाळ विठ्ठल भक्तीत तल्लीन

## वारकरी संस्कृती, संताचे विचार, भारतीय परंपरा आणि राष्ट्रीय मूल्यांचा विद्यार्थ्यांनी दिला प्रभावी संदेश

**● पाथर्डी । वीरभूमी–**
आषाढी वारी पवित्र पर्वाचे औचित्य साधत पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी मुली यांच्या संयुक्त विद्यमाने आज पारंपरिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरणात भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा, संतांच्या विचारांचा जागर आणि भारतीय संस्कृतीचे जतन करण्याचा संदेश या दिंडीतून प्रभावीपणे देण्यात आला.

दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी संत, वारकरी, श्री विठ्ठल-रुक्मिणी तसेच विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, अभंग, हरिनाम आणि भक्तिमय वातावरणात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. दिंडीमधून सामाजिक ऐक्य, संस्कार, राष्ट्रप्रेम, पर्यावरण संवर्धन, भारतीय संस्कृतीचे जतन आणि संत परंपरेचे महत्त्व यांचा प्रभावी संदेश देण्यात आला.


■ छाया । अनिल खाटेर

या प्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती जयश्री कार्ले, तालुका शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, केंद्रप्रमुख श्रीमती सविता कुटे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. निशा अनिल खाटेर, सौ. जयश्री काळोखे, सौ. ज्योती केदार, मुख्याध्यापिका श्रीमती नंदा तुपे, मुख्याध्यापक राजू गोल्हार, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, ग्रामस्थ तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक आविष्काराचे, त्यांच्या शिस्तबद्ध सहभागाचे तसेच शिक्षकांनी केलेल्या नियोजनाचे मनापासून कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक होत असून संत परंपरेतील समता, सेवा, सद्भावना आणि मानवतेचे संस्कार अधिक दृढ होतात, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

दिंडी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षिका शिला नागरे, मनीषा कराड, मोनिका फुंदे, हिरा शिरसाट, अर्चना खाडे, लता भंडारे, मंगल किर्तने, सुरेखा बडे, भावना देवरे, ज्योती जाधव, कविता शिरसाट, ज्योती भोसले, अनुराधा निऱ्हाळी, मंदा पालवे, छाया चंदनशिव, मनीषा फटांगरे, श्री अशोक पालवे, सुरेश जायभाये आणि श्री घोरतळे सर यांनी मोलाचे सहकार्य केले.

> मोबाईल, सोशल मीडियाच्या आहारी जाणाऱ्या आजच्या पिढीसमोर भारतीय संस्कृतीचे जिवंत दर्शन घडविण्याचे काम जिल्हा परिषद शाळेच्या दिंडीने केले. संतांच्या विचारांची ओळख, हरिनामाचा गजर, सामूहिक शिस्त, भक्ती आणि सामाजिक ऐक्य यांचा अनुभव चिमुकल्यांना प्रत्यक्ष मिळाला. त्यामुळे ही दिंडी केवळ मिरवणूक न ठरता संस्कारांची चालती-बोलती शाळा ठरली.
>
> **– सौ. निशा खाटेर,**
> अध्यक्षा, शालेय व्यवस्थापन समिती

# पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक किटचे वाटप

## व्हॉईस ऑफ मीडिया व जयहिंद लोकचळवळीचा उपक्रम । डॉ. सुधीर तांबे यांचे पत्रकारांनी समाजहितासाठी संघटितपणे कार्य करण्याचे आवाहन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
लोकशाही बळकट ठेवण्यासाठी पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य तो करत असतो. त्यामुळे पत्रकारांनी स्वतः च्या कुटुंबासह समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संघटितपणे कार्य करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.

व्हॉईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना आणि जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथे पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले. शिक्षण ही भविष्यातील सर्वात मोठी गुंतवणूक असून पत्रकारांच्या पाल्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

डॉ. तांबे म्हणाले, जयहिंद लोकचळवळ निरोगी, सुदृढ, समताधिष्ठित आणि एकसंघ समाज घडविण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. समाजात भेदभाव न ठेवता परस्पर सहकार्याची भावना जोपासली पाहिजे. प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजा उपलब्ध झाल्या तरच राष्ट्र खऱ्या अर्थाने प्रगत होईल. सुदृढ नागरिक हाच प्रगत राष्ट्राचा खरा पाया आहे.

यावेळी जामखेडचे अविनाश बोधले, श्रीगोंद्याच्या गायत्री ढवळे, शेवगावचे अल्ताफ शेख, संगमनेरचे भारत रेघाटे, पाथर्डीचे महादेव दळे, श्रीगोंद्याचे मुश्ताक शेख आणि नेवासाचे रमेश पाडोळे यांनी मनोगत व्यक्त केले. व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक उपक्रमांचे त्यांनी कौतुक करत पत्रकारांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे संघटना अधिक सक्षम होत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गडाख यांनी केले. संघटनेचे संचालक गोरक्षनाथ मदने यांनी पत्रकारांनी संघटित राहून समाजहितासाठी अधिक सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन केले. राज्य विंग प्रमुख अमोल मतकर यांनी संघटनेचा उद्देश, आतापर्यंतचे कार्य आणि भविष्यातील दिशा स्पष्ट करत पंचसूत्री कार्यक्रमांतर्गत आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, शासकीय योजनांचा लाभ आणि संघटनात्मक बळकटीकरणावर विशेष भर दिला जात असल्याची माहिती दिली. विविध क्षेत्रांसाठी स्वतंत्र विंगची स्थापना करून संघटनेचे कार्य अधिक प्रभावी करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.



यावेळी जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्षांनी संघटनात्मक कामकाजाचा आढावा सादर केला. पत्रकारांच्या विविध समस्या, अडचणी आणि अपेक्षांवर मुक्त चर्चा झाली. जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गडाख यांनी संघटना पत्रकारांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, अशी ग्वाही दिली.

जिल्हा सचिव नवनाथ वावरे यांनी आभार प्रदर्शन करताना आमदार सत्यजित तांबे आणि माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या माध्यमातून अहिल्यानगर, नाशिक, धुळे आणि नंदुरबार या चार जिल्ह्यांतील पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक किट उपलब्ध करून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पत्रकारांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक उपक्रमांना त्यांचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे संचालक गोरक्षनाथ मदने यांनी केले. या प्रसंगी जिल्हाभरातील व्हॉईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, सदस्य आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.